# 24 डिसेंबर

## आजचा सुविचार :

उत्साह हेच सर्वकाही आहे फक्त ते गिटारच्या तारांप्रमाणे नीट आवळलेले असायला हवे.

## आजचे पंचांग :

वार – शुक्रवार
दिनांक : 24 डिसेंबर 2021
तिथी – मार्गशीर्ष
नक्षत्र – मघा
सुर्योदय – सकाळी 6.56 वाजता
सूर्यास्त – सायंकाळी 6. 08 वाजता

## आजचे दिनविशेष :

1999: काठमांडू येथून नवी दिल्लीला येणाऱ्या ’इंडियन एअरलाइन्स फ्लाईट ८१४’ या विमानाचे तालिबानी अतिरेक्यांनी अपहरण करुन ते विमान अफगणिस्तानातील कंदाहार येथे नेले.

1910 : स्वातंत्र्यवीर सावरकर यांना जन्म ठेपेची व काळ्या पाण्याची शिक्षा

1899 : पांडुरंग सदाशिव साने ऊर्फ ’साने गुरूजी’ यांचा जन्म – नामवंत साहित्यिक, बालसाहित्यिक, समाजवादी नेते, समाजसुधारक व स्वातंत्र्यसैनिक. त्यांचे ’श्यामची आई’ हे पुस्तक प्रकाशनक्षेत्रातील सर्व विक्रम मोडणारे ठरले आहे.

1524 : वास्को द गामा – पोर्तुगीज दर्यावर्दी. अफ्रिकेला वळसा घालून युरोपातुन भारतात येण्याचा मार्ग त्याने शोधला.

## आजचे इंग्लिश शब्द :

1) Guava – पेरू 2) Fig - अंजीर 3) Tamarind – चिंच 4) Pomegranate – डाळींब

## आजची प्रश्नमंजुषा :

1) तुमच्या घरातील सर्वात वयस्क व्यक्तीचे नाव सांगा.
2) आपली ज्ञानेंद्रिये कोणती?
3) प्रकाश संश्लेषण क्रिया वनस्पतीच्या कोणत्या भागात घडते?
4) आयताची परिमिती काढण्याचे सूत्र काय आहे?

## बोधकथा :

### कोल्हा, रानमांजर आणि ससा

एक लहानसा ससा होता. तो खूप भित्रा होता. तो भित्रा ससा एका बिळात रहात असे. त्याने एके दिवशी आपल्या बिळाच्या तोंडाशी एका कोल्ह्याला बसलेले पाहिले, तो खूप घाबरला. पण त्याने विचार केला की, बिळाचे तोंड लहान आहे. त्यातून कोल्हा काही आत येऊ शकणार नाही. मग त्याची भीति कमी झाली.नंतर, एक दिवस त्याने कोल्हा आणि रानमांजर गप्पा मारीत आहेत असे पाहिले. हे काही बरे नाही असे त्याला वाटले. थोड्या वेळाने ते रानमांजर सशाच्या बिळात शिरले आणि त्याला आपल्या पंजानी ओरबाडू लागले. ससा भिऊन बाहेर पळाला. तोच कोल्ह्याने त्याच्यावर झडप घातली आणि दोघांनी मिळून त्याच्यावर ताव मारण्यास सुरुवात केली.मरता मरता ससा म्हणाला, ‘तुमच्या दोघांची मैत्री झाली तेव्हाच मी ओळखलं की आता आपली काही धडगत नाही.’

तात्पर्य - एकमेकांशी सतत भांडणाऱ्या दोन माणसांची एकी झाली की एखादा गरीब संकटात सापडतो.